ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# महावितरण कंपनीच्या 'महावितरण अभय योजना' व 'गो ग्रीन योजनेचा' अभ्यास

**प्रा. डॉ. व्ही. बी. बैरागी[1], ढुस त्रिवेणी संजय[2]**

[1]*मार्गदर्शक, बी.एस.टी. महाविद्यालय, संगमनेर,जि.अहमदनगर*

[2]*संशोधक विद्यार्थिनी*

***Corresponding Author:*** *प्रा. डॉ. व्ही. बी. बैरागी*

**DOI - 10.5281/zenodo.14875345**

**प्रास्तविक**:

महावितरण किंवा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (MSEDCL) ही संपूर्ण महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची मालकीची उपकंपनी आहे. ही कंपनी भारतातील सर्वात जास्त वीज वितरण युटिलिटी आहे. पूर्वी विजेची निर्मिती, पारेषण आणि वितरण हे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ(MSEB ) पहात होते. परंतु भारत सरकारच्या विद्युत कायदा २००३ नुसार MSEB चे ६ जून २००५ रोजी ४ कंपन्यांमध्ये विभाजन करण्यात आले.

- महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ MSEB होल्डिंग कंपनी
- महानिर्मिती किंवा महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड
- महापारेषण किंवा महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड
- महाराष्ट्र किंवा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (MSEDCL)

महावितरण संपूर्ण महाराष्ट्रात एकूण २८.४ दशलक्ष वेगवेगळ्या ग्राहकांना वीज पुरवठा करते. त्या ग्राहकांमध्ये वेगवेगळ्या ग्राहकांचा समावेश होतो.उदाहरणार्थ घरगुती ग्राहक, कृषी ग्राहक, व्यावसायिक ग्राहक, औद्योगिक ग्राहक इ. महावितरण आपल्या वीज ग्राहकांना विविध योजनांच्या माध्यमातून सुविधा पुरवते.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) महावितरण कंपनीचा अभ्यास करणे.

२) महावितरण कंपनीच्या योजनांचे अध्ययन करणे.

**संशोधनाची व्याप्ती**:

सदर संशोधनाचा अभ्यास महावितरण कंपनीने पुरवल्या जाणाऱ्या योजना पुरताच मर्यादित आहे. या योजनेमध्ये फक्त महावितरण अभय योजना व ग्रीन योजना या दोनच योजनांपुरता मर्यादित आहे.

**संशोधन पद्धती:**

संशोधकाने संशोधनाच्या दृष्टीने तथ्य संकलनासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर केलेला आहे. यामध्ये महावितरण संकेतस्थळ वार्षिक प्रशासकीय अहवाल, जर्नल, वृत्तपत्रे, संदर्भ पुस्तके, नियतकालिके, मासिके इत्यादींचा वापर केलेला आहे.

**माहिती संकलन व विश्लेषण:**

महावितरण आपल्या वीज ग्राहकांच्या अडीअडचणी व समस्यांची दखल घेऊन ग्राहकांना सोयीसुविधा उपलब्ध करून विविध योजनांच्या माध्यमातून त्यांना त्यांच्या गरजेनुसार वीज पुरवठा करण्यास प्रयत्न करत आहे. ग्राहकांच्या समाधानातच महावितरण कंपनीचे उज्वल भविष्य अवलंबून आहे म्हणूनच ग्राहक समाधानासाठी महावितरण कंपनी

आपल्या वीज ग्राहक योजनांचे अध्ययन करणे गरजेचे आहे. या योजनांचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे -

**१) महावितरण अभय योजना:**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड कडून महावितरण अभय योजना राबविण्यात आलेली एक महत्त्वाची योजना आहे. विविध आर्थिक अडचणींमुळे वीज कनेक्शन बंद केलेल्या ग्राहकांना या योजनेच्या माध्यमातून मोठा दिलासा मिळाला आहे. घरगुती ग्राहक व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांना थकबाकीमुळे त्यांच्या वीज पुरवठ्यावर परिणाम होऊ नये यासाठी ही योजना महत्त्वाची ठरली आहे.

या योजनेत ग्राहकांना थकबाकीवरील व्याज आणि विलंब शुल्क माफीसह त्यांच्या थकित बिलांचे परतफेडचे योग्य पर्याय देते. थकीत वीज बिलामुळे अनेक वीज ग्राहक आर्थिक ताणतणावात आले होते. त्यामुळे या महावितरण अभय योजनेच्या माध्यमातून ग्राहकांना ३० टक्के आगाऊ रक्कम भरण्याची सवलत देण्यात आलेली आहे व उर्वरित रक्कम सहा हप्त्यामध्ये भरता येईल.

महावितरण अभय योजनेचे उद्दिष्ट हे थकबाकी ग्राहकांना सवलतीच्या माध्यमातून वीज पुरवठा सुरळीत करणे हा आहे. ही महावितरण अभय योजना केवळ बिगर कृषी ग्राहकांसाठी लागू आहे आणि ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

ग्राहकांना या महावितरण अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी MSEDCL (महावितरण) च्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा स्थानिक महावितरण कार्यालयात जाऊन पात्रता तपासून घ्यावी त्यानंतर 30% रक्कम आगाऊ भरून अर्ज सादर करावा लागेल. शिल्लक राहिलेली रक्कम सहा हप्त्यामध्ये भरण्यासाठी कंपनीशी करार करावा लागतो.

महावितरण अभय योजना आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या वीज ग्राहकांसाठी अत्यंत उपयोगी ठरलेली आहे. ही महावितरण अभय योजना ग्राहकांना त्यांच्या वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी उत्तम संधी प्रदान करते. ही योजना महाराष्ट्रातील वीज ग्राहकांसाठी एक सकारात्मक पाऊल आहे.

**महावितरण अभय योजनेचे मुख्य वैशिष्ट्ये:**

**१) व्याज विलंब शुल्क माफी:** या महावितरण अभय योजनेत वीज ग्राहकांचे थकबाकीवरील सर्व व्याज आणि विलंब शुल्क पूर्णपणे माफ होते.

**२) ३० टक्के आगाऊ रक्कम भरण्याची अट:** या योजनेत वीज ग्राहकांना मूळ थकबाकी रकमेच्या केवळ ३० टक्के रक्कम आगाऊ भरावी लागते.

**३) हप्त्यांमध्ये रक्कम भरण्याची सुविधा:** या योजनेत वीज ग्राहकांना उर्वरित ७० टक्के रक्कम सहा हप्त्यांमध्ये भरण्याची सुविधा आहे.

**४) पात्रता:** ही योजना सर्व बिगर कृषी ग्राहकांसाठी लागू आहे ज्यांचे वीज कनेक्शन थकबाकीमुळे कायमस्वरूपी बंद झाले आहे.

**५) मुदतवाढ:** सुरुवातीला ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत असलेली योजना ग्राहकांच्या प्रचंड प्रतिसादानंतर ३० मार्च २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे.

**६) थेट कायदेशीर कार्यवाही नाही:** थेट कायदेशीर कार्यवाही करण्याऐवजी ही योजना सुविधा म्हणून लागू करण्यात आली आहे.

**गो-ग्रीन योजना:**

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र सरकारच्या महावितरण विभागाने गो-ग्रीन योजना सुरू केलेली आहे. या गो-ग्रीन योजनेच्या माध्यमातून प्रत्येक ग्राहकाला वीजबिलात १२० रुपये पर्यंत सवलत दिली जाते. महावितरणची ही योजना काळाची गरज आहे. राज्यातील वीज ग्राहकाने या योजनेत सहभागी होऊन पर्यावरण संरक्षणासाठी योगदान द्यावे. आधुनिक जगाच्या स्पर्धेमध्ये आज आपण अनेक कामे मोबाईलच्या मदतीने करतो. जसे की, मोबाईलचे

रिचार्ज, बँकेत पैसे भरणे, एकमेकांना पैसे पाठवले असतील, लाईट बिल भरणे असेल अशा गोष्टी आपण करत असतो. यामुळे आपला वेळ आणि पैसा दोन्ही वाचतो. राज्यातील बहुतांश लोक आता मोबाईलच्या माध्यमातून महावितरण चे विज बिल भरतात मात्र असे असतानाही त्यांच्याकडे कागदी लाईट बिल नेहमीप्रमाणे येते. जे लोक ऑनलाईन विज बिल भरतात ते या बिलाकडे पाहतही नाहीत कारण त्यांनी ऑनलाईन विज बिल भरलेले असते आणि बिल भरल्याचा मेसेज त्यांना आलेला असतो. त्यामुळे त्यांना कागदी लाईट बिल लागतच नाही. अशांसाठी महावितरणने एक नवीन योजना म्हणजेच गो-ग्रीन योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून जे ग्राहक कागदी विज बिल न घेता ई-मेल किंवा एसएमएस वर ऑनलाईन बिल घेतात त्यांना प्रतिबिलानुसार १० रुपयाची सवलत या योजनेअंतर्गत दिली जाते. म्हणजेच वर्षाला ग्राहकाची १२० रुपयाची बचत होते. महावितरण आपल्या ग्राहकांना कागदी विज बिल पाठवते. यावर मोठ्या प्रमाणात कागदाचा वापर होतो आणि मोठ्या प्रमाणात पैसाही खर्च होतो कारण प्रत्येक बिल छपाईसाठी किमान २ रुपये खर्च महावितरणला येतो आणि कागदाचा अपव्यय जास्त मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळेच महावितरण ने आता पुढाकार घेऊन ग्राहकांनी कागदी बिल नाकरावे आणि ई-मेल एसएमएस वर विज बिल पाहून ऑनलाईन लाईट बिल भरावे यासाठी महावितरण कंपनीने ग्रीन-योजना २०२४ सुरू केलेली आहे.

**गो-ग्रीन योजनेची वैशिष्ट्ये:**

- या योजनेअंतर्गत, वीजग्राहकांना ई-मेल किंवा एसएमएसद्वारे वीजबिल मिळते.
- या योजनेअंतर्गत, वीजग्राहकांना वीजबिलावर डिस्काऊंट मिळतो.
- या योजनेअंतर्गत, वीजग्राहकांना WSS च्या नोंदणीकृत ईमेल पत्त्यावर ई-बिल मिळते.

**निष्कर्ष व उपायोजना:**

१) महावितरण अभय योजना फक्त एक सप्टेंबर २०२५ ते ३० मार्च २०२५ पर्यंत उपलब्ध आहे. या कालावधीत वाढ करावी. किंवा कालमर्यादा नसावी.

२) महावितरण अभय योजनेचा लाभ फक्त बिगर कृषी ग्राहकांनाच मिळतो या योजनेत कृषी ग्राहकांचा देखील समावेश करून घ्यावा.

३) महावितरण अभय योजनेचा फायदा फक्त थकीत वीज ग्राहकांनाच होतो तर या योजनेचा फायदा पूर्ण भरलेल्या ग्राहकांना देखील व्हावा.

४) बऱ्याच ग्राहकांना गो ग्रीन या योजनेची कल्पना नाही यासाठी महावितरणाने जनजागृतीसाठी आपल्या वीज ग्राहकांना या योजनेविषयी कल्पना द्यावी.

**संदर्भ सूची:**

१) https://pro.mahadiscom.in/Go-Green/gogreen.jsp

२) https://www.mahadiscom.in/pd_amnesty/index_mr.php

३) https://wss.mahadiscom.in/wss/wss?uiActionName=getPDAmnestyGuestUserDetailsLink&Lang=Marathi

४) विजया कमले, स्वाती टेंभरे, २०१९, महानिर्मिती महावितरण व महापारेषण, साई ज्योती पब्लिकेशन

५) व्ही. एन. स्वामी, २०१९, महानिर्मिती व महावितरण, विद्याभारती प्रकाशन

६) दैनिक लोकसत्ता, अहमदनगर

७) दैनिक महाराष्ट्र टाइम्स, अहमदनगर

८) दैनिक सकाळ, पुणे